प्रसिध्दी पत्रक दिनांक:-13/10/2021

गणेश मुंढे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे येरमाळा व सुशन जाधवर, पोलीस पाटील, रत्नापुर यांनी तक्रारदाराकडे 1,00,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती 70,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबादच्या जाळयात

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | १) गणेश मुंढे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे येरमाळा<br>२) सुशन जाधवर, पोलीस पाटील, रत्नापुर |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.21.08.2021 रोजी पोलीस ठाणे येरमाळा व येडश्वरी मंदिर परिसर, येरमाळा येथे |
| तपासी अधिकारी | श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 70,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्याविरुध्द पोलीस ठाणे येरमाळा येथे आलेल्या निनावी अर्जावर कारवाई न करणेसाठी. |

यातील तक्रारदार यांचेविरुध्द पोलीस ठाणे, येरमाळा येथे आलेल्या निनावी अर्जावर कारवाई न करणेसाठी गणेश मुंढे, सहा.पोलीस निरीक्षक यांनी तक्रारदार यांचेकडे 1,00,000/- रु लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.21.08.2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक, अशोक हुलगे यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.21.08.2021 रोजी गणेश मुंढे, सहा.पोलीस निरीक्षक यांची पोलीस ठाणे, येरमाळा व येडेश्वरी मंदिर परिसर येथे लाच मागणी पडताळणी केली असता त्यांनी व सुशन जाधवर, पोलीस पाटील, रत्नापुर यांनी तक्रारदार यांचेकडे नमुद कामासाठी 1,00,000/- रु लाचेची मागणी करुन तजोडीअंती 70,000/- रु लाच रक्कम स्विकारण्यास संमत्ती दिल्याचे निष्पन्न झाले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे येरमाळा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक श्री.विशाल खांबे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद व श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद यांनी केली असुन सदर कारवाईस पोना/अर्जुन मारकड, पोकॉ/विष्णु बेळे, विशाल डोके, सिध्देश्वर तावसकर, अविनाश अचार्य यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

मोबाईल क्रमांक :-

1) मा.डॉ.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8888807299

2) श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100

3) टोल फ्री क्र. 1064, दूरध्वनी क्र.- 02472-222879

E-Mail ID:- dysposmanabad@gmail.com

कार्यालय पोलीस उप अधिक्षक अँटी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद

Scanned with CamScanner